# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## मराठी विभाग

लोकमत

# राजगुरु महाविद्यालयात यूथ पार्लमेंट चॅम्पियनशिप

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** महाराष्ट्र पोलीसअंतर्गत खेड पोलीस ठाण्यामार्फत हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात डायरेक्टर जनरल्स यूथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. युवकांमध्ये समाजातील ज्वलंत विषयांवर विचार करण्याची व त्यावर उपाय शोधण्याची ऊर्जा निर्माण करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेसाठी छेडछाड, डॉल्बीमुक्त अभियान, रॅगिंग, बालक व स्त्रियांवर होणारे अत्याचार, भ्रष्टाचार, गर्भलिंगतपासणी हे विषय ठेवण्यात आले होते. ही स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ गटांत झाली. तालुक्यातील सर्व माध्यमिक विद्यालये व महाविद्यालयांतील सुमारे ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

वरिष्ठ गट पदवीपर्यंत - प्रथम - आरती विघ्ने, पायल बोरकर, कोमल गायकवाड (हुतात्मा राजगुरु महाविद्यालय), द्वितीय - प्रीती जाधव, शिल्पा कांबळे, अंकिता शिंदे (रत्नाई महिला महाविद्यालय)



डायरेक्टर जनरल्स यूथ पार्लमेंट चॅम्पियनशीप वक्तृत्व स्पर्धत सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना पारितोषक देताना ॲड.देवेंद्र बुट्टेपाटील, पोलिस निरिक्षक प्रदिप जाधव.

◆ या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील म्हणाले, की सध्याचा युवक सामाजिक प्रश्नांसंदर्भात कसा विचार करतो, हे पाहणे औत्सुक्याचे असते. त्यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धा महत्त्वाच्या असतात. सामाजिक शांतता, सुरक्षितता निर्माण होण्यासाठी या तरुणांच्या विचारांचा परिणाम होतो का, हे पाहत असतानाच त्यांच्या पोलिसांकडून कोणत्या अपेक्षा असतात. या संदर्भात या तरुणांच्या सूचनांचा विचार व्हायला हवा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कनिष्ठ गट ८वी ते १२पर्यंत - प्रथम - ऋग्वेद काळे, सूरज गावडे, समीक्षा जैद (हुतात्मा राजगुरु महाविद्यालय), द्वितीय - समृद्धी गायकवाड, वैष्णवी चौधरी, संजना बनकर (सानेगुरुजी विद्यालय खरपुडी), तृतीय - निशा करवंदे, प्रगती तरडे, सोनल मलगे (उच्च माध्यमिक विद्यालय वाशेरे).

विजेत्या स्पर्धकांना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तर, सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्रचार्य प्रा. जी. जी.नगायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

तरुणांची ऊर्जा ही भारताची सर्वांत मोठी शक्ती आणि भांडवल आहे. त्याचा सकारात्मक वापर समाजाच्या विविध क्षेत्रांत व्हायला हवा.

महिलांच्या समस्यांवर चर्चा करण्यापेक्षा ज्यांच्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागतो, त्या घटकांना खऱ्या अर्थाने मार्गदर्शनाची गरज आहे. कारण पुरुषप्रधान संस्कृतीची मानसिकता जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत महिलांच्या आत्मसन्मानाचा प्रश्न कायम राहील, असे त्यांनी सांगितले. यासाठी किशोरवयीन विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याची गरज व्यक्त केली. प्रा. पल्लवी खोल्लम, प्रा. उमेश जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Pune Gramin
Page No. 9 Dec 08, 2017
Powered by: erelego.com

सकाळ

४

# राजगुरू महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

राजगुरुनगर, ता. ६ : "समाजाची पुरुषप्रधान संस्कृतीची मानसिकता जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत महिलांच्या आत्मसन्मानाचा प्रश्न कायम राहील," असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व्यक्त केले.

खेड पोलिस ठाण्यामार्फत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'डायरेक्टर जनरल्स यूथ पार्लमेंट चॅम्पियनशिप' वक्तृत्व स्पर्धा नुकतीच झाली. त्या वेळी बुट्टे पाटील बोलत होते. या स्पर्धेत तालुक्यातील माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयातील सुमारे ३३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. अविनाश कोहिनकर, पत्रकार रामचंद्र सोनवणे यांनी काम पाहिले. विजेत्या स्पर्धकांना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, पोलिस निरीक्षक प्रदीप जाधव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : 'डायरेक्टर जनरल्स यूथ पार्लमेंट चॅम्पियनशिप' वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्यांना पारितोषिक देताना (डावीकडून दुसरे) ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, प्रदीप जाधव व मान्यवर.

प्रा. पल्लवी खोल्लम, प्रा. उमेश जगताप यांनी सूत्रसंचालन, प्रा. अविनाश कोहिनकर यांनी निकालवाचन; तर पोलिस निरीक्षक प्रदीप जाधव यांनी प्रास्ताविक केले.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे-** वरिष्ठ गट (पदवीपर्यंत)- प्रथम क्रमांक- आरती शिन्दे, पायल बोरकर, कोमल गायकवाड (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय), द्वितीय क्रमांक- प्रीती जाधव, शिल्पा कांबळे, अंकिता शिंदे (रत्नाई महिला महाविद्यालय)

कनिष्ठ गट (इयत्ता आठवी ते बारावीपर्यंत)- प्रथम क्रमांक- ऋग्वेद काळे, सूरज गावडे, समीक्षा जैद (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय),

द्वितीय क्रमांक- समृद्धी गायकवाड, वैष्णवी चौधरी, संजना कनकर (साने गुरुजी विद्यालय खरपुडी),

तृतीय क्रमांक- निशा करवंदे, प्रज्ञा तरडे, सोनल मलघे (उच्च माध्यमिक विद्यालय वाशेरे).

१० केसरी पुणे, ७ डिसेंबर २०१७

# राजगुरू महाविद्यालयात डायरेक्टर जनरल यूथ वक्तृत्व स्पर्धा



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या गटांसह मान्यवर

राजगुरूनगर, (वार्ताहर) : महाराष्ट्र पोलीस अंतर्गत खेड पोलीस ठाण्यामार्फत येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात डायरेक्टर जनरल्स यूथ पार्लमेंट चॅम्पियनशीप वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. युवकांमध्ये समाजातील ज्वलंत विषयांवर विचार करण्याची व त्यावर उपाय शोधण्याची उर्जा निर्माण करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी छेडछाड, डॉल्बीमुक्त अभियान, रॅगिंग, बालका व स्त्रीयांवर होणारे अत्याचार, भ्रष्टाचार, गर्भलिंग [illegible] हे विषय देण्यात आले होते. ही स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ गटात आयोजित करण्यात आली. तालुक्यातील सर्व माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयातील सुमारे ३३ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

पारितोषिक विजेते वरिष्ठ गट पदवीपर्यंत– प्रथम क्रमांक– आरती पिंन्ने, पायल बोरकर, कोमल गायकवाड (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय), द्वितीय क्रमांक– प्रीती जाधव, शिल्पा कांबळे, अंकिता शिंदे (रत्नाई महिला महाविद्यालय), कनिष्ठ गट ८ वी ते १२ वी पर्यंत– प्रथम क्रमांक– ऋग्वेद काळे, सूरज गावडे, समीक्षा जैद (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय). द्वितीय क्रमांक– समृध्दी गायकवाड, वैष्णवी चौधरी, संजना बनकर (साने गुरूजी विद्यालय खरपुडी). तृतीय क्रमांक– निशा करवंदे, प्रगती तरडे, सोनल मलघे (उच्च माध्यमिक विद्यालय, वाशेरे)

विजेत्या स्पर्धकांना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तर सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. अविनाश कोहिणकर, पत्रकार रामचंद्र सोनवणे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. पल्लवी खोल्लम, प्रा. उमेश जगताप यांनी केले. निकालवाचन प्रा. अविनाश कोहिणकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव यांनी केले.

पुण्य नगरी
बुधवार, ६ डिसेंबर २०१७ । पुणे 3

# कायद्याच्या अंमलबजावणीसाठी खुले व्यासपीठ हवे

## देवेंद्र बुट्टे पाटील : राजगुरूनगरला युथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धा



। राजगुरूनगर : प्रतिनिधी

कायद्याची अंमलबजावणी कशी केली पाहिजे, याचा सर्वांगीण विचार, संवाद खुल्या व्यासपीठावरून होणे गरजेचे आहे, असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी राजगुरूनगर येथे केले.

समाजात शांतता, सुसूत्रता, सामंजस्य राखण्यासाठी युथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धा या संकल्पनेचा उपयोग होईल. यासाठी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील यांनी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. याच संकल्पनेतून खेड पोलीस स्टेशन डायरेक्टर जनरल आयोजित युथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धा येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात घेण्यात आली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रवीण व्यवहारे, सचिव उत्तम कुंभार, माजी अध्यक्ष तथा स्पर्धेचे परीक्षक अविनाश कोहिनकर, पत्रकार रामचंद्र सोनवणे, प्रा. उमेश जगताप, पोलीस हवालदार संदीप भापकर यांच्यासह मोठ्या संख्येने स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते. या स्पर्धेत विजयी झालेले स्पर्धक पुढीलप्रमाणे -

महाविद्यालयीन गट : प्रथम क्रमांक - कोमल गायकवाड, पायल बोरकर, आरती पिंन्ने, द्वितीय - अंकिता शिंदे, शिल्पा कांबळे, प्रीती जाधव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा गट - प्रथम - ऋग्वेद काळे, सुरेश गावडे, समीक्षा जैद; द्वितीय - समृद्धी गायकवाड, वैष्णवी चौधरी, संजना बनकर; तृतीय - सोनल मेदगे, निशा करवंदे, प्रगती तरडे. या स्पर्धेसाठीच्या ट्रॉफी रोटरी क्लब राजगुरूनगर यांच्या वतीने देण्यात आल्या. सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप, प्रा. पल्लवी खोल्लम यांनी केले.

08 प्रभात पुणे, बुधवार, दि. ६ डिसेंबर २०१७

# कायद्यांबाबत खुल्या व्यासपीठावर संवाद व्हावा

## अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील : राजगुरुनगरमध्ये युथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन



राजगुरुनगर : येथे वक्तृत्व स्पर्धेत विजेत्यांना पारितोषिक देताना अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील.

राजगुरुनगर, दि. ५ (प्रतिनिधी) - कायद्यांची अंमलबजावणी कशी केली पाहिजे, याचा सर्वांगीण विचार, संवाद खुल्या व्यासपीठावरून होणे गरजेचे आहे, असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी राजगुरुनगर येथे केले.

समाजात शांतता, सुव्यवस्था, सामंजस्य राखण्यासाठी युथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धा या संकल्पनेचा उपयोग होईल. यासाठी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरेपाटील यांनी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. याच संकल्पनेनुसार खेड पोलीस स्टेशन इन्स्पेक्टर अंतर्गत आयोजित युथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धा येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात घेण्यात आली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी स्पर्धक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रदीप वायकर, सचिव उत्तम कुंभार, माजी अध्यक्ष तथा स्पर्धेचे परीक्षक अविनाश कोहिनकर, पत्रकार रामचंद्र सोनवणे, प्रा. रमेश जगताप, पोलीस हवालदार संदीप भापकर यांच्यासह मोठ्या संख्येने स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना पोलीस निरीक्षक प्रदीप जाधव म्हणाले की, वक्तृत्व स्पर्धा हा महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यासाठी मदत व्हावी. तालुक्यातील सर्व माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयातील सुमारे ३१ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. या स्पर्धेत विजयी झालेले स्पर्धक पुढीलप्रमाणे-

महाविद्यालयीन गट : प्रथम क्रमांक - कोमल गायकवाड, पायल बोरकर, आरती शिंदे (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर), द्वितीय क्रमांक - अंकिता शिंदे, शिल्पा कांबळे, प्रीती जाधव (तन्वी महाविद्यालय राजगुरुनगर) माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा गट - प्रथम क्रमांक - ऋत्विक काळे, मुकेश गावडे, समीक्षा जैद (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर), द्वितीय क्रमांक - समृद्धी गायकवाड, वैष्णवी चौधरी, संजना बनकर (साने गुरुजी विद्यालय खरपुडी), तृतीय क्रमांक - सोनल शेटी, सीता काशिद, प्राची डाके (जुनियर कॉलेज वाशेरे). या स्पर्धेत परीक्षक म्हणून पत्रकार रामचंद्र सोनवणे, रोटरीचे क्लबचे माजी अध्यक्ष अविनाश कोहिनकर यांनी केले.

६ पुढारी पुणे, शनिवार ९ डिसेंबर २०१७

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे यश



प्रथम क्रमांक विजेता वरिष्ठ गट.

राजगुरुनगर : प्रतिनिधी

खेड पोलिस विभागाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विभागीय स्तरावरील युथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धेचा दुसरा टप्पा नुकताच पार पडला. ही स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन गटात आयोजित करण्यात आली होती. या टप्प्यातील विजेते स्पर्धक पुण्यात होणाऱ्या पोलिस अधिक्षक स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

वरिष्ठ गटात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील आरती शिंदे, पायल बोरकर, कोमल गायकवाड यांचा प्रथम क्रमांक आला. त्यांना डॉ. संजय शिंदे यांनी मार्गदर्शन केले. द्वितीय क्रमांक दत्तात्रेय वळसे पाटील महाविद्यालय पारगाव यांचा आला. कनिष्ठ गटात प्रथम क्रमांक भानचंद विद्यालय भांबोली (छेडछाड), द्वितीय क्रमांक भीमाशंकर विद्यालय शिनोली (अमली पदार्थांचा गैरवापर), तृतीय क्रमांक नवीन उच्च माध्यमिक विद्यालय वाकळ (बालक व किशोर होणारा अत्याचार) यांनी पटकाविला.

विजेत्या स्पर्धकांना प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, खेडचे पोलिस निरीक्षक प्रदीप जाधव, घोडेगावचे सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रेय दराडे, पोलिस इन्स्पेक्टर आदिनाथ महानवर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



पुणे जिल्हा उत्तर १ पुढारी पुणे, बुधवार ६ डिसेंबर २०१७

# वक्तृत्व स्पर्धेत राजगुरू महाविद्यालयाचे यश

राजगुरुनगर : प्रतिनिधी

महाराष्ट्र पोलिस विभागांतर्गत खेड पोलिस ठाणे यांच्या माध्यमातून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात डायरेक्टर जनरल्स युथ पार्लमेंट चॅम्पियनशीप वक्तृत्व स्पर्धा मंगळवारी (दि.५) आयोजित करण्यात आली होती. विजेत्यांना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, पोलिस निरीक्षक प्रदीप जाधव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. परीक्षक म्हणून प्रा. अविनाश कोहिनकर यांनी काम पाहिले.

**वरिष्ठ गट पदवीपर्यंत**

**प्रथम क्रमांक** - आरती शिन्दे, पायल बोरकर, कोमल गायकवाड (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय).

**द्वितीय क्रमांक** - प्रीती जाधव, शिल्पा कांबळे, अंकिता शिंदे (चाकण महिला महाविद्यालय).

**कनिष्ठ गट ८ वी ते १२ पर्यंत**

**प्रथम क्रमांक** - [illegible] काळे, सुरज पवार, स्नेहा जैन (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय).

**द्वितीय क्रमांक** - [illegible] गायकवाड, वैष्णवी चौधरी, संजना कदम (राजे शिवाजी विद्यालय खरपुडी).

**तृतीय क्रमांक** - गिता काळे, प्राची गर्डे, सोनल [illegible] (उच्च माध्यमिक विद्यालय वाडे).



८ ते १४ डिसेंबर २०१७/४

खेड टाइम्स

# राजगुरू महाविद्यालयात यूथ पार्लमेंट चॅम्पियनशीप स्पर्धा

राजगुरुनगर, (प्रतिनिधी) - महाराष्ट्र पोलीस अंतर्गत खेड पोलीस स्टेशनमार्फत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात डायरेक्टर जनरल्स यूथ पार्लमेंट चॅम्पियनशीप वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. युवकांमध्ये समाजातील ज्वलंत विषयांवर विचार करण्याची व त्यावर उपाय शोधण्याची ऊर्जा निर्माण करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी छेडछाड, डॉल्बीमुक्त अभियान, रॅगिंग, बालक व स्त्रियांवर होणारे अत्याचार, भ्रष्टाचार, गर्भलिंग तपासणी हे विषय देण्यात आले होते. ही स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ गटात आयोजित करण्यात आली. तालुक्यातील सर्व माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयातील मुलांनी

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख